-: प्रेसनोट दिनांक- ०६/०८/२०१९ :-

जयवंत शंकर पाटील, भांडारपाल, सीपीआर हॉस्पीटल,कोल्हापूर यांनी हॉस्पीटलमध्ये मृतदेह झाकणेसाठी आवश्यक असणारे सफ़ेद मांजरपाट कापड पुरवठा केलेबाबत बिल मंजुरीसाठी ट्रेझरी येथे पाठविलेबाबत व हॉस्पीटलसाठी आवश्यक असणारे कपडे, इतर साहीत्य पुरवठा करणेची ऑर्डर तकारदार यांना देणेसाठी रु.४,००,०००/- लाच मागणी करुन त्यापैकी रु.१,००,०००/- लाच रक्कम स्विकारलेबाबत.

---

यातील तकारदार यांना छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,कोल्हापूर(सी.पी.आर.हॉस्पीटल,कोल्हापूर) यांचेकडून मृतदेहांसाठी आवश्यक असणारे सफेद मांजरपाट कापड ६००० मीटर पुरवठा करणेसाठी ऑर्डर प्राप्त झाली होती. तकारदार यांनी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, शाखा इचलकरंजी यांचेकडे नमुद ऑर्डर नोंदविली. त्यानुसार दि.१५/०७/२०१९ रोजी महामंड़ळाकडून ६००० मीटर कापड सीपीआर हॉस्पीटल कोल्हापूर यांना पुरवठा केला. त्याबाबत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ लि.शाखा इचलकरंजी यांचेकडून कापड पुरविणेबाबतचे डीलीव्हरी चलन सी.पी.आर.हॉस्पीटल कोल्हापूर येथे जमा केली. त्यासोबत सीपीआर हॉस्पीटल कोल्हापूर येथे कापड पुरवठा केलेबाबत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ लि.शाखा इचलकरंजी यांचेकडून बील तयार करुन लिनन किपर श्री.पाटील यांचेकडे दिली. तसेच सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापूर येथे लागणारे सर्जन गाऊन, कॉयर गाद्या इत्यादी साहीत्य पुरवठा करणेबाबतचा प्रस्ताव तकारदार यांनी सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापूर येथे सादर केला आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळालेंनतर सी.पी.आर.हॉस्पीटल यांचेकडून पुरवठा आदेश प्राप्त होतो.

तकारदार महामंडळाकडून सी.पी.आर.हॉस्पीटल,कोल्हापूर येथे पुरवठा केलेल्या कापडाचे बील कोषागार कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविले काय? याची चौकशी करणेसाठी सीपीआर हॉस्पीटल येथे लिनन किपर जयवंत पाटील यांचेकडे गेले असता, पाटील यांनी सदर बील मंजुरीसाठी कोषागार कार्यालयाकडे पाठवितो. तसेच पुढील कापडाची ऑर्डर देणेसाठी तकारदार यांचेकडे रु. ४,००,०००/- मागणी केली होती.

तदनंतर पाटील यांनी महामंडळामार्फत पुरवठा केलेल्या कापडाची बीले तयार करुन कोषागार कार्यालय, कोल्हापूर येथे पाठविली. त्यापैकी कापड पुरवठा केलेबाबतचे रु.२,७७,२००/- किंमतीचे एक बिल महामंडळाचे खात्यावर प्राप्त झाले आहे. उर्वरित बील श्री.पाटील यांनी कोषागार कार्यालयाकडे पाठविले असून त्याची रक्कम अद्याप महामंडळाचे खात्यावर जमा होणे बाकी आहे. सदरबाबत तकारदार यांनी दि. ०५/०८/२०१९ रोजी तकारी अर्ज दिला होता.

तकारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक ०५/०८/२०१९ रोजी लिनन किपर जयवंत पाटील यांचे योगेश्वरी कॉलनी, पाचगांव रोड, कोल्हापूर येथील निवासस्थानी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तकारदार यांचेकडे लिनन किपर जयवंत पाटील यांनी सी.पी.आर.हॉस्पीटल,कोल्हापूर येथे मृतदेहांसाठी आवश्यक असणारे सफेद मांजरपाट कापड पुरवठा केलेबाबतचे बील मंजूरीसाठी कोषागार कार्यालय कोल्हापूर येथे पाठविलेबाबत व हॉस्पीटलसाठी आवश्यक असणारे कपडे, इतर साहीत्य पुरविणेची ऑर्डर देणेसाठी रु.४,००,०००/- रक्कमेची मागणी करुन त्यापैकी रु.१,००,०००/- दि. ०६/०८/२०१९ रोजी सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापूर येथे आणून देणेस सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि.०६/०८/२०१९ रोजी सी.पी.आर.हॉस्पीटल,कोल्हापूर येथे सापळा कारवाई आयोजित केली असता, लिनन किपर जयवंत पाटील यांनी तकारदार यांचेकडून रु.१,००,०००/-लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत मुळ तकारदार व फिर्यादी यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक जयवंत शंकर पाटील, भांडारपाल, सीपीआर हॉस्पीटल,कोल्हापूर यांचेविरुध्द लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ मनोज खोत, पोना शरद पोरे, पोकॉ मयुर देसाई, रुपेश माने, चालक पोहेकॉ-सुरज अपराधव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कमांकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.